| MHNG080037022015 | दाखल तारीख | ०३.११.२०१६ | | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | ०३.११.२०१६ | | |
| | निकाल तारीख | ०६.०५.२०२६ | | |
| | कालावधी | वर्ष | म. | दि. |
| | | ०९ | ०६ | ०३ |

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र.२, कामठी, जिल्हा नागपुर यांचे न्यायालयात</u>**

(पिठासिन अधिकारी राजेश र. शेरेकर)

**नियमीत फौजदारी खटला क्र.२२२/२०१६** **नि.क्र. २४**

(पोलीस स्टेशन कन्हान येथील गुन्हा नोंद क्र.१०९/२०१६ भारतीय दंड विधानाचे कलम ४५२, ३२३ व ५०४ अन्वये )

| | | |
|---|---|---|
| **सरकार पक्ष/फिर्यादी** | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस स्टेशन कन्हान,<br>जि. नागपुर. |
| **सादरकर्ते** | | सहायक सरकारी अभियोक्ता<br>श्री. ए.पी.लुले |
| **आरोपी** | | **रोहीत तोफसिंग चव्हाण**<br>वय – १९ वर्षे, व्यवसायः– शिक्षण<br>रा. आनंद नगर, कन्हान, जि. नागपूर |
| **सादरकर्ते** | | ––– |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०४.०९.२०१६ |
| फिर्याद दाखल तारीख | ०५.०९.२०१६ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | ०३.११.२०१६ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १०.०८.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०३.११.२०२३ |

| | |
|---|---|
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | --- |
| निकालाची तारीख | ०६.०५.२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेलतर. | --- |

| आरोपीचा अनुक्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्र.संहितेच्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रोहीत तोफसिंग चव्हान | ०५.०९.२०१६ | ०६.०९.२०१६ | भा.दं.वि. चे कलम ४५२, ३२३ व ५०४ | निर्दोष मुक्त | .. | .. |

## सरकारपक्षाचे साक्षीदार

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | रजनीश वामनराव मेश्राम | पंच साक्षिदार |
| २. | निलकंठ डोळकुंजी राऊत | तपासी अधिकारी |

## सरकारपक्षाचा कागदोपत्री पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १४ | घटनास्थळ पंचनामा |

## बचावपक्षाचे साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| .. | .. | .. |

## न्यायालयाने दिलेले निशानी क्रमांक

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| .. | .. | .. |

**जप्त मुद्देमाल**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ... | .. |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०६ मे, २०२६ रोजी घोषित)

आरोपीविरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४५२, ३२३ व ५०४ अन्वये दंडनीय अपराधाकरीता दोषारोप ठेवण्यात आले आहे.

२. **घटनेची हकीकत थोडक्यात अशी की,**

फिर्यादी सुभद्रा राणे हिने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली की, दिनांक ०४.०९.२०१६ रोजी सायंकाळी ०७.३० वाजताच्या सुमारास ती तिच्या घरात असताना एक अनोळखी मुलगा तिच्या घरात दारूच्या नशेत आला व तुझा मुलगा भोला कुठे आहे असे तिला विचारून शिवीगाळ केली. तिने त्याला विचारले की, 'काय झाले आहे, तु मला शिवीगाळ का करतो'. तेव्हा त्याने तिला ढकलाढकल केली. ती ओरडली असता त्याने तिला ढकलून घराबाहेर पळून गेला. तिच्या ओरडण्याच्या आवाजाने मोहल्ल्यात राहणारे स्वप्नील मते, त्याची आई व शेजारील पाच सहा लोक तेथे आले. त्यांनी त्या मुलाला बाहेर जातांना पाहिले तेव्हा स्वप्नील मते याने तिला सांगितले की, तो रोहीत चव्हान, रा.आनंद नगर येथील आहे. ती त्याला ओळखत नसुन आरोपीने तिच्या घरात घुसुन शिवीगाळ केली. तसेच आरोपीने तिला दारूच्या नशेत ढकलाढकल केली. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपीविरुध्द फिर्याद दिली. सदर फिर्यादवरुन गुन्हा क्रमांक १०९/२०१६ नोंद करण्यात आला. तपासी अधिकारी यांनी तपास पुर्ण करुन आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४५२, ३२३ व ५०४ अन्वये अंतर्गत दोषारोप पत्र दाखल केले.

**३.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरूध्द भा.द.वि.चे कलम ४५२, ३२३ व ५०४ अन्वये नि.क्र.०६ वर दंडनीय अपराधाकरीता दोषारोप निश्चित केला. आरोपीने

त्याचे प्रतीकथन नि.क्र.०७ अन्वये त्याच्याविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप नाकारुन सुनावणीची मागणी केली, म्हणुन संपरीक्षा पुढे चालविण्यात आली. त्यानंतर दि.२१.०५.२०२४ रोजी पासून आरोपी गैरहजर होता. सदर प्रकरणी एकूण दोन साक्षीदार तपासण्यात आले. त्यानंतर आरोपी गैरहजर असल्यामुळे त्याच्याविरुध्द माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी वारंवार पकड वॉरंट काढले. तसेच या न्यायालयाने आरोपीविरुध्द जाहीरनामा नि.क्र.१६ काढला, परंतु आरोपी न्यायालयात हजर झाला नाही. यावरुन आरोपी हा फरार आहे असे समजल्यामुळे प्रकरण फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २९९ प्रमाणे पुरावा नोंदविण्यासाठी ठेवण्यात आले. सदर प्रकरणी नि.क्र.१७, १९ ते २३ प्रमाणे साक्ष समन्स काढण्यात आले. परंतू साक्षीदार मिळून आले नाही. तसेच नि. क्र.१८ प्रमाणे साक्षीदार भोला हिवराज राने हा मयत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला व आरोपीचा फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला नाही.

**४.** सदर खटल्यातील संपूर्ण पुरावा व कागदपत्रे पाहुन खालील मुद्दे निर्धारीत केले व त्यास मी खालील नमुद कारणास्तव समोर दर्शविलेल्या निष्कर्षाप्रत पोहचलो:

| **अ.क्र.** | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | दि.०४.०९.२०१६ रोजी १९.३० ते १९.३६ वाजताच्या दरम्यान तुकाराम नगर, कन्हान, ता.पारशिवणी, जि. नागपूर येथे आरोपीने फिर्यादीला दुखापत किंवा गैर निरोध करण्याची पुर्वतयारी करून फिर्यादीच्या घरात गृह अतिक्रमण केल्याचे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | ...नाही. |
| २. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून ढकलाढकल केल्याचे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | ...नाही. |
| ३. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीकडून | |

| | | |
|---|---|---|
| | शांतता भंग घडवून आणण्याचे उद्देशाने फिर्यादीचा अपमान करून तिला प्रक्षोभित केल्याचे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | ...नाही. |
| ४. | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## कारणमिमांसा

**५.** प्रस्तूत प्रकरणी एकूण दोन साक्षीदार तपासण्यात आले. त्यानंतर आरोपी हा सतत गैरहजर असल्यामुळे त्याच्याविरुद्ध पकड वॉरंट व जाहीरनामा काढण्यात आला. परंतु आरोपी प्रकरणात हजर झाला नाही. त्यामुळे प्रकरण फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २९९ प्रमाणे पुरावा नोंदविण्यासाठी लावण्यात आले. या न्यायालयाने प्रस्तुत प्रकरणातील उर्वरीत साक्षदारांना समन्स पाठविले, परंतु ते सर्व समन्स नि.क्र.१७, १९ ते २३ अन्वये साक्षदार मिळून आले नाही व नि.क्र.१८ अन्वये साक्षीदार भोला हिवराज राने हा मयत आहे अश्या शे–यासह परत आले.

**६.** आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने पंच साक्षिदार सा.क्र.१ रजनीश वामनराव मेश्राम यांना नि.क्र.०८ कडे व तपासी अधिकारी सा.क्र.२ निलकंठ डोळकुंजी राऊत यांना नि.क्र.१३ कडे तपासले.

### मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता :–

**७.** भा.द.वि. कलम ४५२, ३२३ व ५०४ खालील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपीने फिर्यादीला दुखापत किंवा गैर निरोध करण्याची पुर्वतयारी करून फिर्यादीच्या घरात गृह अतिक्रमण केल्याचे, फिर्यादीला शिवीगाळ करून ढकलाढोप केल्याचे व फिर्यादीकडून शांतता भंग घडवून आणण्याचे उद्देशाने फिर्यादीचा अपमान करून तिला प्रक्षोभित केल्याचे शाबीत करणे महत्वाचे आहे.

८. सा.क्र.१ रजनीश हा पंच साक्षिदार असून सदर साक्षिदाराने अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. तसेच दुसरा पंच साक्षिदार शामराव याने अभियोग पक्षास सहाय्य केले नाही त्यामुळे त्याची साक्ष याकामी नोंदविण्यात आली नाही. त्यामुळे याकामी घटनास्थळ पंचनामा शाबीत झालेला नाही.

९. सा.क्र.०२ निलकंठ डोळकुंजी राऊत हे तपासी अधिकारी असून त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक ०५.०९.२०१६ रोजी ते पोलीस स्टेशन कन्हान येथे नेमणुकीस होते. घटनेचा तपास त्यादिवशी त्यांच्याकडे देण्यात आला. तपासकामी त्यांना फिर्याद व छापील फिर्याद प्राप्त झाली. त्यानंतर त्यांनी दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१४ तयार केला. त्यानंतर त्यांनी साक्षिदारांचे बयान नोंदविले. आरोपीला अटक केली. आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्यामुळे त्याच्याविरुध्द दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, घटनास्थळी खूप लोकांची घरे व वस्ती आहे. त्यांनी कथन केले की, घटनास्थळाच्या चतुःसिमा पंचनामा पाहून सांगू शकतात. इतर प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

१०. अभिलेखावरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सा.क्र.०२ तपासी अंमलदार यांनी जरी त्यांच्या पुराव्यात त्यांनी घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१४ पंच साक्षिदारासमक्ष केल्याचे कथन केले असले तरी स्वतंत्र पंच साक्षिदाराने सदर बाब स्पष्टपणे नाकारली आहे. दुस–या पंच साक्षिदाराला अभियोग पक्षाने तो अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे तपासले नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा स्वतंत्र पंच साक्षिदारामार्फत शाबीत झालेला नाही. तसेच फिर्यादी सुभद्रा ही नि.क्र.१७ वरील अहवालानुसार मिळून आलेली नाही. फिर्यादीचा पुरावा आरोपीविरुध्दचा गुन्हा शाबीत करण्यासाठी महत्वाचा होता. परंतु फिर्यादी मिळून न आल्यामुळे तिची साक्ष अभिलेखावर आलेली नाही. केवळ तपासी अंमलदार यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवून आरोपीने गुन्हा केला होता असे गृहित धरणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे आरोपीने घटनेच्या दिवशी फिर्यादीच्या

घरात गृह अतिक्रमण करून फिर्यादीला ढकलाढकल केली व शिवीगाळ केली ही बाब अभियोग पक्ष संशयापलीकडे शाबीत करू शकलेला नाही.

**११.** एकंदरीत अभिलेखावर आरोपीविरुद्ध असा कुठलाही पुरावा आला नाही की, ज्या द्वारे आरोपीला शिक्षा होऊ शकेल. सदर प्रकरण हे जवळपास ०९ वर्षापेक्षा जास्त जुने आहे व आरोपी हा ब–याच वर्षापासून फरार आहे. त्यामुळे सदर प्रकरण पुराव्या अभावी आरोपीविरुद्ध प्रलंबीत ठेवणे न्यायोचित होणार नाही. आरोपीविरुध्द ठेवलेले आरोप संशयापलीकडे सिध्द करण्यास अभियोगपक्ष असमर्थ ठरला. त्यामुळे आरोपी हा संशयाचा फायदा मिळण्यास पात्र ठरतो. करीता मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्रमांक ४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१** आरोपी रोहीत तोफसिंग चव्हाण याला फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड संहितेचे कलम ४५२, ३२३ व ५०४ अन्वये या गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

**२** आरोपीचे जमानतीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे व त्याच्या जमानतदाराला मुक्त करण्यात येत आहे.

RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2026.05.06 13:41:27 +0530

कामठी. (रा.र. शेरेकर)
दिनांक : ०६.०५.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, कामठी

## –: प्रमाणपत्र :–

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र आदेश यामधील सर्व मजकूर मूळ निकालपत्र आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | सौ. परिणीता अ. निर्मल |
| न्यायालयाचे नांव | रा.र.शेरेकर<br>(प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, न्यायालय क्र. २ कामठी) |
| टाईप केल्याचा दिनांक | ०६.०५.२०२६ |
| न्यायिक अधिका–यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | ०६.०५.२०२६ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | ०६.०५.२०२६ |